# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक-17.06.2026** **वार- बुधवार**

**वैष्णव-रेल्वे**

केंद्रीय रेल्वे तसंच माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांच्या हस्ते आज पुणे रेल्वे स्थानकावर विविध विकासकामांचा शुभारंभ आणि पायाभरणी करण्यात आली. यावेळी पुणे–साईनगर शिर्डी एक्सप्रेस रेल्वेला हिरवा झेंडा दाखवून तिच्या सेवेला प्रारंभ करण्यात आला. या कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे डिजिटल माध्यमातून सहभागी झाले.

यावेळी बोलताना वैष्णव यांनी पुणे रेल्वे विभागाच्या सर्वांगीण विकासासाठी अनेक महत्त्वाचे प्रकल्प हाती घेण्यात आल्याची माहिती दिली. हडपसर स्थानकावरील विद्यमान तीन फलाटांचं आधुनिकीकरण करून चौथा फलाट उभारण्यात आला असून त्यामुळं दररोज अतिरिक्त पाच रेल्वेगाड्या चालवणं शक्य होणार आहे. शिवाजीनगर स्थानकावरही नवीन फलाट आणि स्टेबलिंग लाईनची उभारणी करण्यात आली आहे. तसंच पुणे जंक्शनवरील कोच देखभाल कार्य भविष्यात भोलापूर इथल्या स्वतंत्र डेपोमध्ये हलवण्याचे काम सुरू असल्याचं त्यांनी सांगितलं.

पुण्याच्या वाढत्या लोकसंख्येच्या पार्श्वभूमीवर आळंदी इथं अत्याधुनिक मेगा कोचिंग टर्मिनल उभारण्यात येणार असून त्यामध्ये नऊ फलाट, सात स्पॅट लाईन्स आणि १७ स्टेबलिंग लाईन्स असतील. या प्रकल्पासाठी रेल्वेकडं उपलब्ध असलेल्या जागेचा उपयोग करण्यात येणार आहे.

पुणे रेल्वे स्थानकाच्या विस्तारासाठी सुमारे ६०० कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात येणार असून विद्यमान सहा फलाटांबरोबर आणखी सहा नवीन फलाट उभारले जातील. त्यामुळे स्थानकावरील फलाटांची संख्या १२ होईल. तसंच जुन्या आरआरआय प्रणालीऐवजी अत्याधुनिक इलेक्ट्रॉनिक इंटरलॉकिंग प्रणाली कार्यान्वित करण्यात येणार आहे.

या सर्व प्रकल्पांमुळं पुढील तीन वर्षांत पुणे रेल्वे विभागाची क्षमता दुप्पट होऊन पुण्यातून सुमारे २० अतिरिक्त रेल्वेगाड्या सुरू करता येतील, असा विश्वास वैष्णव यांनी व्यक्त केला.

मुंबई–पुणे मार्गावरील क्षमता वाढवण्यासाठी तिसरी आणि चौथी रेल्वेमार्गिका उभारण्याचं काम वेगानं सुरू असल्याचं त्यांनी सांगितलं. तसंच मुंबई–पुणे आणि पुणे–हैदराबाद या प्रस्तावित बुलेट ट्रेन मार्गांमुळं पुणे–मुंबई प्रवास अवघ्या ४८ मिनिटांत, तर पुणे–हैदराबाद प्रवास सुमारे दोन तास आठ मिनिटांत पूर्ण होऊ शकेल, असं त्यांनी नमूद केलं.

महाराष्ट्रातील रेल्वे विकासासाठी केंद्र सरकारकडून यंदा सुमारे २३ हजार ९०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून राज्यात रेल्वे पायाभूत सुविधांच्या विकासाला अभूतपूर्व गती मिळाल्याचंही वैष्णव यांनी सांगितलं.

**वैष्णव-रांजणगाव**

तत्पूर्वी, केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज पुण्याजवळ रांजणगाव इथं बोलताना सांगितलं की, भारत, इलेक्ट्रॉनिक्स उत्पादनाचं एक प्रमुख केंद्र म्हणून उदयास आला असून, आता तो जगातील सहाव्या क्रमांकाचा इलेक्ट्रॉनिक्स निर्यातदार देश बनला आहे. रांजणगाव एमआयडीसी इथं अमेरिकन कंपनी 'जाबिल'च्या नवीन उत्पादन प्रकल्पाचं उद्घाटन केल्यानंतर ते बोलत होते.

मंत्र्यांनी सांगितलं की, सध्या देशात दोन सेमीकंडक्टर प्रकल्प उभारले जात आहेत आणि या वर्षाच्या अखेरीस ही संख्या चारवर पोहोचेल. इलेक्ट्रॉनिक्स आणि सेमीकंडक्टर पुरवठा साखळी अधिक बळकट करण्यासाठी पुण्यात अचूक अभियांत्रिकी सुटे भाग उत्पादन सुरू करण्याच्या योजनांचीही त्यांनी घोषणा केली.

याप्रसंगी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, देशातील डिजिटल पायाभूत सुविधांच्या विकासात महाराष्ट्र आघाडीवर आहे आणि भारतातील एकंदर डेटा सेंटर क्षमतेपैकी सुमारे ६० टक्के क्षमता याच राज्यात आहे. तंत्रज्ञान आणि पायाभूत सुविधांमधील गुंतवणुकीसाठी महाराष्ट्र हे पसंतीचं ठिकाण असल्याचंही त्यांनी सांगितलं.

**वृत्त-विभाग**

आकाशवाणी पुणे केंद्राचा प्रादेशिक वृत्त विभाग बंद करण्याचा कोणताही प्रस्ताव नसून तो यापुढंही कार्यरत राहील, अशी स्पष्ट माहिती केंद्रीय रेल्वे तसेच माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली. पुण्याचे खासदार मुरलीधर मोहोळ यांनी प्रादेशिक वृत्त विभाग बंद होणार असल्याच्या वृत्तांबाबत चिंता व्यक्त केल्यानंतर, पुणे दौऱ्यावर असताना वैष्णव यांनी ही भूमिका स्पष्ट केली. स्थानिक बातम्यांचं प्रसारण आणि जनतेपर्यंत माहिती पोहोचविण्याला प्राधान्य दिलं जात असल्याचं वैष्णव यांनी नमूद केलं. दरम्यान, मोहोळ यांनी या निर्णयाचं स्वागत करत पुणे आकाशवाणीनं अनेक दशकांपासून श्रोत्यांना विश्वासार्ह बातम्या आणि माहिती पुरविण्यात महत्त्वाचं योगदान दिल्याचं सांगितलं.

**हेमंतकुमार**

पूना गेस्ट हाऊस स्नेह मंचतर्फे महान गायक हेमंतकुमार यांच्या जन्मदिनानिमित्त त्यांच्या गाण्याच्या माध्यमातून त्यांना पुण्यात ‘ये नयन डरे डरे’ या विशेष कार्यक्रमात त्यांची आठवणीतील गाणी आणि गाण्यांच्या आठवणी सादर करण्यात आल्या. ‘बेकरार करके हमे यू न जाइए’, ‘ये नयन डरे डरे’, ‘गोमू संगतीनं माझ्या तू येशील का’ अशा एकाहून एक अजरामर गीतांचा रसिकांनी आस्वाद घेतला.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**